**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
केंद्रीय कापूस संशोधन संस्था
नागपूर

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 27-06-2023**

**नागपूर(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2023-06-27 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2023-06-28 | 2023-06-29 | 2023-06-30 | 2023-07-01 | 2023-07-02 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 67.8 | 52.2 | 11.8 | 6.9 | 9.7 |
| कमाल तापमान (अं.से) | 28.4 | 28.7 | 29.2 | 30.4 | 31.2 |
| किमान तापमान (अं.से) | 21.5 | 21.4 | 22.2 | 23.0 | 23.2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 98 | 97 | 90 | 84 | 81 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 87 | 81 | 74 | 67 | 65 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 6 | 6 | 5 | 4 | 5 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 271 | 242 | 239 | 236 | 243 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 8 | 8 | 7 | 6 | 7 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• नागपुर जिल्ह्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक २८जून ते ०२, जुलै,२०२३ दरम्यान आकाश अंशतः ते मुख्यतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक २८ व २९ जून २०२३ रोजी सर्वत्र ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक ३० जून २०२३ रोजी बऱ्याचठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक ०१ व ०२ जुलै २०२३ रोजी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक २८ जून २०२३ रोजी तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार स्वरूपाचा पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची अधिक शक्यता, • दिनांक २९ जून २०२३ रोजी तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाचा पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची अधिक शक्यता, • दिनांक ३० जून २०२३ रोजी तुरळक ठिकाणीमेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक ०२ ते ०८जुलै २०२३ या कालावधीमध्ये सरासरी एवढा राहण्याची शक्यता, कमाल व किमान तापमान सरासरी एवढे राहील.

## कृषि सल्ला:

• नागपूर जिल्ह्यासाठी दिनांक २७.०६.२०२३ च्या महसूल मंडळ निहाय पर्जन्यमान अहवालानुसार, नागपूर ग्रामीण तालुक्यतील वाडी, सोनगाव लो. व गोधनी रे. या महसूल मंडळात, कामाठी तालुक्यातील वाडोदा, व कोराडी या महसूल मंडळात, हिंगणा तालुक्यातील हिंगणा, वानाडोंगरी व गुमगाव या महसूल मंडळात, रामटेक तालुक्यातील रामटेक या महसूल मंडळात, पारशिवनी तालुक्यातील आमडी, पारशिवनी, नवेगाव खु. व कन्हान या महसूल मंडळात, काटोल तालुक्याडतील काटोल, येनवा, मेटपांजरा, कोंढाळी, पारडसिंगा व रिधोरा या महसूल मंडळात, नरखेड तालुक्यामतील जलालखेडा, सावरगाव व मेंढला या महसूल मंडळात, सावनेर तालुक्यातील खापा, पाटणसावंगी व बडेगाव या महसूल मंडळात, कळमेश्वर तालुक्यातील कळमेश्वर व धापेवाडा या महसूल मंडळात, उमरेड तालुक्यातील मकरधोकडा, बेला, हेवंती व पाचगाव या महसूल मंडळात, भिवापूर तालुक्यातील मालेवाडा, भिवापूर व कारगाव या महसूल मंडळात, कुही तालुक्यातील कुही, मांडळ व पचखेडी या महसूल मंडळात ०१ ते २७ जून २०२३ दरम्यानच्या कालावधीमध्ये ७५ मिलीमीटर पेक्षा जास्त पावसाची झाली आहे. • नमूद केलेल्या महसूल मंडळामध्ये पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून कोरडवाहू कपाशी ची लागवड ३० जून पर्यंत, सोयाबीन ची पेरणी ०७ जुलै पर्यंत, खरीप तीळ ०७ जुलै पर्यंत, खरीप ज्वारी ची पेरणी १० जुलै पर्यंत, मका ची पेरणी ०७ जुलै पर्यंत, मुग पेरणी ३० जून पर्यंत वाफसा अवस्थेत करावी. • नमूद न केलेल्या महसूल मंडळामध्ये पेरणीयोग्य

(७५ ते १०० मिमी) पाऊस झाला नसलेल्या ठिकाणी शेतकरी बांधवांनी अपुऱ्या ओलाव्याच्या परिस्थितीमध्ये पेरणीची घाई करू नये, शेतकरी बांधवांनी मान्सून चा ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच वाफसा अवस्थेत पेरणी करावी. • मागील झालेला पाऊस आणि पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता,भाजीपाला, फळबागा आणि इतर शेतातील पिकांना ओलीत करणे टाळावे. • फळांच्या बागा, भाजीपाला आणि पेरणी केलेल्या शेतातीलपावसाच्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • पाऊस व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर व इतरधातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • स्थानिक हवामान अंदाज व सूचना यांचा अंदाज घेऊनच शेती कामाचे नियोजन करावे. पाऊस

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• पेरणीयोग्य (७५ ते १०० मिमी) पाऊस झाला नसलेल्या ठिकाणी शेतकरी बांधवांनी अपुऱ्या ओलाव्याच्या परिस्थितीमध्ये पेरणीची घाई करू नये.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सोयाबीन | • नमूद केलेल्या महसूल मंडळामध्ये पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून सोयाबीन ची पेरणी ०७ जुलै पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. • पेरणीयोग्य (७५ ते १०० मिमी) पाऊस झाला नसल्याने शेतकरी बांधवांनी अपुऱ्या ओलाव्याच्या परिस्थितीमध्ये पेरणीची घाई करू नये, शेतकरी बांधवांनी मान्सून चा ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच वाफसा अवस्थेत पेरणी करावी. • बियाणे पेरणीपूर्वी उगवण चाचणी करून उपलब्ध सोयाबीन बियाण्याच्या गुणवत्तेची खात्री करावी, पेरणीसाठी योग्य रोपांची संख्या सध्या करण्यासाठी उगवण क्षमता70% असावी. • शेवटच्या वखराच्या पाळी पूर्वी प्रती हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा २.५ टन कोंबडी खत जमिनीत मिसळावे. • शेतकरी बांधवांनी सोयाबीन लागवडीसाठी रुंद वरंबा सरी किंवा सरी वरंबा तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. या पद्धतीमध्ये शेतात पाणी साचून राहणार नाही तसेच पावसाच्या खंड असलेल्या काळात पिक व्यवस्थापन करण्यात मदत होईल. • सोयाबीन पेरणीसाठी शिफारशीमध्ये दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी तर दोन रोपांतील अंतर १० सेंमी ठेवावे व पेरणी हि २ ते ३ सेंमी खोलीवर करावी. • सोयाबीन पिकास शिफारशीत केलेल्या प्रमाणात सर्व पोषक तत्वे (२५:६०:४०:२० किलो प्रती हेक्टरी, नत्र, स्फुरद, पालाश व गंधक अनुक्रमे) संतुलित पद्धतीने फक्त पेरणीच्या वेळीद्यावे. • सोयाबीन पिकासाठी वरील शिफारशीतील अन्नद्रव्याची मात्रा हि (१) ५६ किलो युरिया + ३७५ ते ४०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट + ६७ किलो म्युरेट ऑफ पोटाश किंवा (२) डीएपी @ १२५ किलो + ६७ किलो म्युरेट ऑफ पोटाश + २५ किलो बेंटोनेट सल्फर किंवा (३) १२:३२:१६, २०० किलोप्रती हेक्टर + २५ किलो बेंटोनेट सल्फर प्रती हेक्टर या पैकी कोणत्याही एका रासायनिक खताच्या संयोजनाद्वारे पूर्ण करू शकता. • सोयाबीन पिकामध्ये सुरुवातीच्या काळात रोग आणि किडी पासून संरक्षण करण्यासाठी आणि रोपांची योग्य संख्या सुनिश्चित करण्यासाठी, बियाण्यास बुरशीनाशक आणि कीटकनाशकाची बीज प्रक्रिया करावी. • अॅशझोक्सीस्ट्रोबिन २.५ % + थायोफेनेट मिथाइल ११.२५ % + थायामेथॉक्सम २५ % एफएस (१० मिली/किलो बियाणे) किंवा पेनफ्लुफेन + ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन (१ मिली/किलो बियाणे) किंवा थायरम + कार्बोक्सिन (३ ग्रॅम प्रती किलो बियाणे) किंवा किंवा थायरम + मॅन्कोझेब (३ ग्रॅम प्रती किलो बियाणे) या प्रमाणात शिफारस केलेल्या बुरशीनाशकांनी बियाण्याची प्रथम प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर बियाणे काही काळ सुकवावे आणि नंतर थायमिथोक्झाम ३० एफएस १० मिली प्रती किलो बियाणे किंवा इमिडाक्लोप्रिड४८ एफएस १.२५ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात रासायनिक किटक नाशकाची बीज प्रक्रिया करावी. |
| कपाशी | • नमूद केलेल्या महसूल मंडळामध्ये पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून कोरडवाहू कपाशीची ची पेरणी ०७ जुलै पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. • पेरणीयोग्य (७५ ते १०० मिमी) पाऊस झाला नसल्याने शेतकरी बांधवांनी अपुऱ्या ओलाव्याच्या परिस्थितीमध्ये पेरणीची घाई करू नये, शेतकरी बांधवांनी मान्सून चा ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच वाफसा अवस्थेत पेरणी करावी. • कोरडवाहू पेरणीसाठी कमी ते मध्यम कालावधीच्या बीटी/नॉन बीटी वाणांचा वापर करावा तर बागायती पेरणीसाठी मधयम उशिरा येणारे किंवा उशिरा पक्व होणारे वाण निवडावे. • गुलाबी बोंडअळीचे जीवनचक्र खंडित करण्यासाठी मागील हंगामात गुलाबी बोंडअळीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झालेल्या शेतात पीक न घेता त्या ठिकाणी पिक फेरपालट करावी. • कापूस हे गुलाबी बोंडअळीचे एकमेव यजमान खाद्य वनस्पती आहे, म्हणून पीक फेरपालट केल्यास या किडीचे जीवनचक्र खंडित होण्यास मदत होते. • रोग प्रवण शेतात मातीजन्य रोग आणि सूत्रकृमीचा निरीक्षणासाठी पीक फेरपालट खूप प्रभावी आहे. • बियाण्यांपासून होणाऱ्या रोगांच्या व्यवस्थापनासाठी कार्बोक्झिन ३७.५ % + थायरम ३७.५ % डीएस) @ ३.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे (मूळ कुज आणि जिवाणूजन्य रोग) किंवा फ्ल्यूक्सापायरोक्सॅड (३३३ जी/एल एफएस) @ १.५ मिली प्रती किलो बियाणे किंवा टेट्राकोनाझोल ११.६ % डब्ल्यू/डब्ल्यू (१२.५ % डब्ल्यू/व्ही) एसएल @ १.५ मिली प्रति किलो |

| पिक | पिक निहाय सल्ला |
| --- | --- |
| | बियाणे या प्रमाणात बियाणेजण्य रोगाच्या (मूळ कुज रोग) व्यवस्थापनासाठी बीजप्रक्रिया करावी. • नत्र स्थिरीकरणासाठी अझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळण्यासाठी स्फुरद विरघळविणारे जीवाणू (पीएसबी) २० ते २५ ग्राम प्रती किलो बियाणे प्रमाणात जीवाणू संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. • कपाशीमध्ये मुग आणि उडीद यासारख्या आंतरपिकाचा (१:१) ओळीत समाविष्ट करावा. • कपाशी पिकामध्ये सुरुवातीच्या अवस्थेत तणांचे नियंत्रण करण्यासाठी उगवण पूर्व तणनाशक पेंडीमेथालिन ३८.७ % सीएस @ ७०० मिली २०० लिटर पाणी प्रती एकर या प्रमाणात वापर करावा. • कपाशी लागवडीसाठी शिफारशीतील अंतर (ओळxदोन झाडातील अंतर) व खतांची मात्रा: अनुक्रमे, देशी वाण (६०x१५, ६०x३० सेंमी, ४०:२०:२० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर), सुधारित (६०x३० सेंमी, ६०:३०:३० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर), कोरडवाहू बीटी संकरीत कपाशीसाठी (९०x४५, ९०x६० सेंमी, ९०:४५:४५ किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर) आणि बागायती बीटी कपाशीसाठी (१२०x३०, १२०x६० सेंमी, १२०:६०:६० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर). |
| भात | • घरचे बियाणे वापरायचे असल्यास त्याची उगवण शक्ती घरीच तपासून घ्यावी व ७० ते ८०% च्या वर उगवणशक्ती असल्यास ते बियाणे पेरणीसाठी वापरावे तसेच त्या अनुषंगाने बियाण्याचे प्रमाण ठेवावे. • पूर्व विदर्भासाठी शिफारस केलेल्या भात वाणांचाच लागवडीसाठी वापर करावा. • पेरणीपूर्वी धान बियाण्यास बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रियेसाठी १० लीटर पाण्यात ३०० ग्रॅम मीठ (३%) या प्रमाणात द्रावण करून त्यात बी ओतावे. द्रावण स्थिर झाल्यावर तरंगणारे हलके रोगयुक्त बी चाळणीने काढून जाळून टाकावे. तळातील निरोगी बी २-३ वेळा स्वच्छ पाण्याने धुऊन सावलीत २४ तास वाळवावे. पेरणीपूर्वी बियाण्यास बुरशीनाशकाची बीज प्रक्रिया करावी तसेच ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक ४ ते ५ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास चोळून बीज प्रक्रिया करावी. • पेरीव धान पद्धत :-पेरीव पद्धतीने भाताची लागवड ही जुलैच्या १० तारखेपर्यंत करावी. • दोनदा नांगरटी करून व त्यानंतर डिस्कहॅरो किंवा रोटाव्हेटरणे जमिनीची योग्य मशागत करून भुसभुशीत करावी. • कमी ते माध्यम कालावधीच्या भात वाणाची निवड करावी. • पेरणी करतानी भाताचे/धानाचे बि जमिनीत ५ से. मी. पेक्षा खोल जाणार नाही याची काळजी घ्यावी. • तण नियंत्रणासाठी पेंडीमेथॅलीन ३०% ई. सी. (उगवणपूर्व) @ ५० मि.ली. किंवा प्रेटिलाक्लोर ५०% ई. सी. (उगवणपूर्व) @ २० ते ३० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर ओलावा असल्यास लगेच फवारणी व ३० दिवसांनी निंदण करावे. • भात/धान पेरणीसाठी नागर, तिफण, मार्कर, ट्रॅक्टर, ट्रॅक्टर चाळीत पेरणी यंत्र, ड्रम सीडर ईत्यादीचा वापर करता येऊ शकतो. |
| तूर | • नमूद केलेल्या महसूल मंडळामध्ये पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून तूर पेरणी ०७ जुलै पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. • पेरणीयोग्य (७५ ते १०० मिमी) पाऊस झाला नसल्याने शेतकरी बांधवांनी अपुऱ्या ओलाव्याच्या परिस्थितीमध्ये पेरणीची घाई करू नये, शेतकरी बांधवांनी मान्सून चा ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच वाफसा अवस्थेत पेरणी करावी. • पेरणीपूर्वी तुरीच्या बियाण्यास कार्बोक्सीन ३७.५ % + थायरम ३७.५ % डीएस या पुर्वमिश्रीत बुरशीनाशकाची ३ ग्राम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. • तूर बियाण्याला बीज प्रक्रियेसाठी रायझोबियम किंवा स्फुरद विरघळविणारे खते (पीएसबी) {२५० ग्राम प्रती १० किलो बियाणे} यांचा वापर करावा. तूर पिकाचे शिफारस केलेले वाण- एकेटी-८८११, पीकेव्ही-तारा, बीएसएमआर-८५३, बीएसएमआर-७३६ आणि आयसीपीएल-८७११९ (आशा). |
| मुग | • नमूद केलेल्या महसूल मंडळामध्ये पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून मुग पेरणी ३० जून पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. • पेरणीयोग्य (७५ ते १०० मिमी) पाऊस झाला नसल्याने शेतकरी बांधवांनी अपुऱ्या ओलाव्याच्या परिस्थितीमध्ये पेरणीची घाई करू नये, शेतकरी बांधवांनी मान्सून चा ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच वाफसा अवस्थेत पेरणी करावी. • मूग पिकाच्या लागवडीकरिता पिकेव्ही मूग-८८०२, पिकेव्ही ग्रीनगोल्ड (एकेएम ९९११) या वाणाची निवड करावी. • प्रती हेक्टरी १२-१५ किलो बियाणे, दोन ओळीतील अंतर ३०/४५ सेंमी आणि दोन झाडामधील अंतर १० सेंमी ठेवावे. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया, खते तसेच जीवाणू संवर्धनाचा वापर करावा. मुग पिकास पेरणीच्या वेळी २० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद प्रती हेक्टरी द्यावे. |
| मका | • नमूद केलेल्या महसूल मंडळामध्ये पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून मका पेरणी ०७ जुलै पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. • पेरणीयोग्य (७५ ते १०० मिमी) पाऊस झाला नसल्याने शेतकरी बांधवांनी अपुऱ्या ओलाव्याच्या परिस्थितीमध्ये पेरणीची घाई करू नये, शेतकरी बांधवांनी मान्सून चा ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच वाफसा अवस्थेत पेरणी करावी. |
| ज्वारी | • नमूद केलेल्या महसूल मंडळामध्ये पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून खरीप ज्वारीची पेरणी ०७ जुलै पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. • पेरणीयोग्य (७५ ते १०० मिमी) पाऊस झाला नसल्याने शेतकरी बांधवांनी अपुऱ्या ओलाव्याच्या परिस्थितीमध्ये पेरणीची घाई करू नये, शेतकरी बांधवांनी मान्सून चा ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच वाफसा अवस्थेत पेरणी करावी. |
| तीळ | • नमूद केलेल्या महसूल मंडळामध्ये पेरणीयोग्य उपलब्ध ओलाव्याची खात्री करून खरीप तीळ पेरणी ०७ जुलै पर्यंतवाफसा अवस्थेत करावी. • पेरणीयोग्य (७५ ते १०० मिमी) पाऊस झाला नसल्याने शेतकरी बांधवांनी अपुऱ्या ओलाव्याच्या परिस्थितीमध्ये पेरणीची घाई करू नये, शेतकरी बांधवांनी मान्सून चा ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच वाफसा अवस्थेत पेरणी करावी. |

### फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • नवीन संत्रावर्गीय फळ बाग लागवडीसाठी जमिनीची/मातीची योग्यता तपासणे आवश्यक आहे. जमिनीची खोली कमीतकमी १ मीटर असावी परंतु योग्य पद्धतीने खते आणि मशागातीचा अवलंब केल्यास भरघोस उत्पन्न देणाऱ्या फळबागांची लागवड १ मीटर पेक्षा कमी खोली असलेल्या जमिनीमध्ये करता येऊ शकते. फळबाग लागवडीसाठी जमीन हि पाण्याचा चांगला निचरा होणारी, चिकन मातीचे प्रमाण ६० पेक्षा कमी असणारी, सामू ८.३ पेक्षा कमी, मुक्त चुनखडीचे प्रमाण १२ टक्के पेक्षा कमी आणि २ मीटर खाली पाण्याची स्थिर पातळी असलेल्या जमिनीची निवड करावी. • लिंबूवर्गीय फळबाग लागवडीसाठी तयार केलेल्या प्रत्येक खड्ड्यांमध्ये २ भाग जमिचीच्या पृष्ठभागावरील माती, १ भाग वाळू आणि १ भाग चांगले कुजलेले शेणखत मिश्र करून भरून घ्यावेत, त्याचबरोबर, प्रत्येक खड्ड्यात १ किलो सिंगल सुपर फॉस्फेट, १ किलो निंबोळी केक आणि १०० ग्रॅम क्लोरपायरीफॉस पावडर टाकावी. • संत्रावर्गीय रोपवाटिका धारकांनी पॉलीथीन पिशव्या भरताना सम प्रमाणात गाळाची माती, शेणखत आणि वाळू एकत्र मिश्र करून भराव्यात.पॉलीथीन पिशव्या मध्ये हवा खेळती राहण्यासाठी व तुंबलेले पाणी बाहेर जाण्यासाठी पिशव्यांना छिद्र पाडावीत. • संत्रावर्गीय फळबागा मध्ये पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराच्या दिशेने व दोन ओळीनंतर ३० सेंमी खोल, ३० सेंमी खालची रुंदी व ४५ सेंमी वरची रुंदी या आकाराचे चर खोदावेत. झाडाच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहू नये म्हणून आळे व दांड सपाट करून घ्यावेत. |

### पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी व सावलीमध्ये निवाऱ्याची व्यवस्था करावी. शक्यतोवर,बैल व इतर जनावरांकडून सकाळी ११ ते दुपारी ०४ वाजेदरम्यान काम करणे टाळावे. गोठ्यातील तापमान गोठ्याचे शेड ला पांढरा रंग द्यावा. शक्य असल्यास शेड मध्ये पाण्याचा फवारा व फोगर्स चा लावावे. जास्त उष्णतेच्या काळात जनावरांच्या अंगावर पाणी फवारावे. जनावरांच्या आहारात हिरवा चारा, प्रथिने, खनिज मिश्रण व मिठाचा समावेश करावा. चरण्यासाठी सकाळी किंवा संध्याकळी सोडावे. |
| गाय | • दुभत्या गाईस दररोज ८ किलो वाळलेला चारा + ६ किलो हिरवा चारा आणि १ किलो खुराक द्यावा. खुराक मिश्रण करताना मका, ज्वारी, बाजरी, गव्हाचा कोंडा याचा वापर करावा. खुरकात २० ग्राम प्रती किलो या प्रमाणात मिश्रण मिसळावे. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

### कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | • उष्णतेपासून संरक्षण मिळण्यासाठी कोंबड्यांच्या शेड ला कापडी पडदे लावावे तसेच हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी.पक्षांना सकस आहार तसेच स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी. |

### इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्हीशेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षितठिकाणाचा |

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| | आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडापालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवूनतळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीलास्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणीकिंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे.जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावरआश्रय घ्यावा. • विजांच्याबचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेचजनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्त्रोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासूनशक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे.शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी.शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोनव्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडीअसलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासूनबनलेल्या इतर कृषी अवजारांपासून दूर रहा. |
| सामान्य सल्ला | • हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. * संशोधनावर आधारित शिफारस. दोन किंवा त्यापेक्षा अधिक रसायने किंवा संजीवके एकत्र मिसळू नये. |